## परिशिष्ट - "अ"

## शर्ती व अटी

१. जागेवर प्रत्यक्षात तालुका निरिक्षक,भुमि अभिलेख /नगरभुमापन कार्यालय यांचेकडुन मोजणी करुन घेतल्याशिवाय जागेवर बांधकामास सुरुवात करु नये.

२. बांधकाम परवानगी अर्जा सोबत सादर केलेली माहिती,कागदपत्रे नियमानुसार बरोबर नसल्यास देण्यांत आलेली परवानगी आपोआप रद्द होण्यास पात्र राहील.

३. बांधकाम हे मंजूर नकाशाप्रमाणे करावयाचे असून अनुज्ञेय बांधकामापेक्षा वाढीव बांधकाम किंवा फेर फार हे नगरपरिषदेच्या पूर्व परवानगीशिवाय करण्यात येवू नये.

४. पावसाळी पाणी अगर इतर सांडपाणी जाण्याचे आसपासचे मिळकत धारकाचे नैसर्गिक हक्कास बाधा येता कामा नये.

५. बांधकामाचे पागोळ्यांचे पाणी इतरांचे हद्दीत पडणार नाही याबाबत दक्षता घेणेत यावी.

६. सांडपाण्याचा निचरा सुस्थितीत होईल याची संपूर्ण दक्षता घेणेची आहे.

७. बांधकाम साहित्य नगरपरिषदेच्या रस्त्यावर / गटारात ठेवल्याचे आढळल्यास आपले बांधकाम परवानगीस स्थगिती देण्यात येईल.

८. कोणत्याही प्रकारे व वादातील बाब उपस्थित झाल्यास नगरपरिषदेचा निर्णय अंतीम राहील.

९. कोणत्याही प्रकारचा वाद उपस्थित झाल्यास परवानगी रद्द करण्यात येईल व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली तसेच दखल केली जाणार नाही.

१०. बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या इतर सर्व संबंधीत शासकिय कार्यालयांची परवानगी बांधकाम सुरु करणे पुर्वी अर्जदारांनी घ्यावयाची आहे.

११. बांधकामामध्ये कोणत्याही ज्वालाग्राही पदार्थांचा वापर करता कामा नये.

१२. बांधकामाचा वापर हा या परवानगीने मंजूरी करण्यात आलेल्या वापरापुरताच अनुज्ञेय आहे.

१३. आपल्या बांधकामामुळे इतरांचे हक्कास, मिळकतीस बाधा येता कामा नये.

१४. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेणेपूर्वी मिळकीतमध्ये पाच झाडे लावणे आवश्यक आहे.

१५. सदरची बांधकाम परवानगी मिळाल्यापासून एक वर्षाचे आंत बांधकामास सुरुवात करणे आवश्यक आहे.एक वर्षाचे आंत बांधकाम सुरु करता आले नाही, तर एक वर्ष मुदत संपणेच्या आंत अर्ज करुन पुढील वर्षाकरिता मुदतवाढ घेणेची आहे. अशी मुदतवाढ न घेतलेस मूळ परवानगी आपोआप रद्द होईल त्याबद्दल कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१६. बांधकामाची सर्व जबाबदारी मालक व आपले इंजिनियर यांचेवर राहील.

१७. सि.स.नं.,एन.ए., मालकी, वहिवाटी वगैरे हक्कांबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी आपलेवर राहील.

१८. बांधकामास सुरुवात करणेपूर्वी सात दिवस आगाऊ इकडील कार्यालयाकडे लेखी कळवावे व होणारे सर्व बांधकाम आपले मालकीचे जागेत करावे.

१९. बांधकामास सुरुवात करणेपूर्वी कंत्राटदार व त्यांचेकडे असलेल्या कामगारांची यादी पोलिसस्टेशनला कळविण्यात यावी.

२०. भुखंडाचे एकुण क्षेत्रातील **१९३.९४** चौ.मि. एवढे बांधकाम अनुज्ञेय आहे. सदर जागेतील इमारतीकरिता सोबतच्या बांधकाम नकाशामध्ये दर्शविल्या प्रमाणे **१९३.९१** चौ.मि. **(Group Housing & Row house)** एवढी बांधकाम परवानगी देण्यांत येत आहे.

२१. प्रकाश व वायुविजन यासाठी ठेवलेल्या खिडक्यांचे क्षेत्र हे त्या संबंधीत खोलीच्या क्षेत्राच्या १/६ पेक्षा कमी असू नये.

२२. नियोजीत बांधकामामुळे भुखंडावर असलेल्या कोणाच्याही वहिवाटीचे हक्कांचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/मालक यांनी परस्पर घेतली पाहिजे.

२३. कंत्राटदार व त्यांचेकडे असणाऱ्या कामगारांची वैद्यकिय तपासणी करुन घेणेत यावी.

२४. सेप्टीक टँक या सोकपीटचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे करणेत यावे, व त्यापासून कोणतीही रोगराई होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**पान २.. वर**

२५. काम सुरु असतांना काही आरोग्याचे अगर इतर दृष्टीकोनातून तपासणी वेळी त्रुटी आढळल्यास. त्यानुसार दिल्या जाणाऱ्या सुचनांची अंमलबजावणी अर्जदार/परवानगीदार यांचेवर राहील.

२६. नियोजीत इमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची सोय तसेच सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरांपूर्वी अर्जदारांनी केली पाहीजे.

२७. सेप्टीक टँकचा व्हेंट पाईप पुरेशा उंचीवर नेऊन त्यावर व्हेंट स्लॉटेड कौल बसवून त्यावर मच्छर प्रतिबंधक जाळी बसविणेत यावी.

२८. रेखांकन मंजुरी व एन.ए.परवानगी प्रत सादर करणेची जबाबदारी अर्जदारावर राहील.

२९. सांडपाणी सेप्टींक टँकमध्ये सोडणेत येऊ नये, त्याची व्यवस्था स्वतंत्रपणे करण्यात यावी.

३०. इमारती सभोवतालच्या भागात कोणतेही बांधकाम करणेत येऊ नये, ते कायम खुले ठेवणे यावे.

३१. इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याशिवाय निवासी वा वाणिज्य वापर करणेत येऊ नये.

३२. नियोजीत बांधकाम मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्या किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

३३. स्थळदर्शक नकाशांवर दाखविल्याप्रमाणे नियोजीत बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर असली पाहिजे व त्याखालील जागा कायम खुली ठेवावी.

३४. सदर रेखांकनाचे जागेत सांडपाणी अथवा भुपृष्ठीत पाणी वाहून नेण्यासाठी जे नैसर्गिक मार्ग असतील ते अबाधीत ठेवावे अथवा त्याची पर्यायी व्यवस्था करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

३५. बांधकामास सुरुवात करणेपूर्वी ज्या जागेचा वापर वाणिज्य कारणासाठी करणेत येणार आहे त्याचा वाणिज्य कारणासाठी बिनशेती आदेश महसूल विभागाकडील सक्षम अधिकाऱ्यांकडून घेणे यावा.

३६. स्टील्टचा वापर वाहनतळासाठीच करणेचा असून ते भविष्यात बंदिस्त करणेत येऊ नये.

३७. भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यापासून आठ दिवसात सदर मालमत्तेची कर आकारणी कर निरिक्षक यांचे समक्ष मोजमापे घेण्यात यावीत. नळ कनेक्शन मंजुर झाले असले तरीही कर आकारणी रक्कम भरल्याशिवाय नळ कनेक्शन दिले जाणार नाही.

३८. सदरचे बांधकाम भुकंपरोधक होईल याची दक्षता घेऊन सक्षम वास्तुविशारद व आर.सी.सी. कन्सल्टंट यांचा सल्ला घेऊन बांधकाम करणेत यावे व सदरची बांधकाम भुकंपरोधक आहे, याबाबतचा दाखला भोगवटा प्रमाणपत्राची मागणी करते वेळेस इकडील कार्यालयास सादर करणेचा आहे. त्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देणेत येणार नाही.

३९. सदर इमारत पुर्ण झाल्यानंतर ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा ठेवणेकरिता इमारतीमध्ये डस्टबीनची व्यवस्था अर्जदाराने करणेची आहे.

४०. वरिल पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास किंवा अटी शर्तीनुसार संदर्भिय जागेचा विकास नआढळल्यास ही बांधकाम परवानगी रद्द करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. अशा परिस्थितीमध्ये होणाऱ्या सर्व आर्थिक किंवा इतर अनुषंगिक नुकसानीस नगरपरिषद कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही, याची नोंद घ्यावी.

४१. नगरपरिषदेने भूमिगत मलनि:सारण योजनेचे काम सुरु केल्यास आपले मिळकती नजिकचे प्रॉपर्टीचेंबर पर्यंत आपले सांडपाणी व सेप्टीकचे आऊटलेट स्वखर्चाने जोडणी करणेचे आहेत. त्याकरिता प्रॉपर्टी चेंबरचा विचार करुन आपले सदर पाईपलाईनचे डिझाईन करणेचे आहे.

४२. प्रस्तावित बांधकाम पुर्ण झाल्यानंतर छतावरचे पाणी पुर्नरभरण Rain Water Harvesting करणे बंधनकारकराहील.

४३. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उप कराची फरकाची रक्कम भोगवटा प्रमाणपत्र घेता वेळेस भरणेबंधनकारक राहील.

४४. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उप कराची फरकाची रक्कम भोगवटा प्रमाणपत्र घेता वेळेस भरणेबंधनकारक राहील.

(signature)

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, सिल्लोड**

# इमारत बांधकाम प्रारंभ करणेचा दाखला

(महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १८९-४ व प्रादेशिक नगररचना कायदा कलम ४५-१ नुसार)

जा.क्र.: नपसि/बां.प/1225/२०१६
कार्यालय नगरपरिषद सिल्लोड
दिनांक :- 22/ 09/२०१६

प्रति,

**श्रीमती पुष्पा नंदकिशोर सहारे व इतर,**
रा.सिल्लोड

**विषय:- इमारत बांधकाम करणेस परवानगी मिळणे बाबत.**

**संदर्भ:- आपला अर्ज दिनांक** २५/०८/२०१६

आपल्या वरील संदर्भिय अर्जाचा विचार करता सिल्लोड नगरपरिषदेच्या हद्दीतील सर्व्हे नं. **३६०** भुखंड क्रं. **३ ते ११** मालमत्ता क्रं. ४६ ते ५४ सि.स.नं. ---- मध्ये सोबतच्या परिशिष्ट अ मधील **१ ते ४४** अटी बंधनकारक ठेवून सोबतच्या मंजूर नकाशा प्रमाणे निवासी/वाणिज्य कारणाकरिता बांधकाम करणेस परवानगी देणेत येत आहे.

**(Group Housing & Row house)**

मुख्याधिकारी
नगरपरिषद, सिल्लोड

**प्रतिलिपी:**

१. क्षेत्र रक्षक / स्वच्छता निरिक्षक नगरपरिषद सिल्लोड यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यांत येत आहे.
२. कर विभाग नगरपरिषद सिल्लोड यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यांत येत आहे.

मुख्याधिकारी
नगरपरिषद, सिल्लोड

युनिक कोड क्रं.

| वर्ष कोड | | | | जिल्हा कोड | | तालुका कोड | | | निर्धारण अधिकारी कोड | | निर्धारण अधिकाऱ्यांनी दिलेला प्रकरण क्रमांक | | | | बांधकामाचा टप्पा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ० | १ | ६ | १ | ६ | १ | ६ | ७ | ० | ४ | 0 | 5 | 0 | 3 | ० | ० |